जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१५/०२/२०२४
## दि.१४/०२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो.स्टे.५६/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६४ वर्षे रा.सुभाषनगर पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०६/०२/२०२४ रोजी रात्रौ २१/३५ वा.सणस ग्राऊंड रोडवर सणस पुतळ्याजवळ पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील ३४,०००/- रू किमतीचा मोबाईल जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.प्रकाश जगताप मो.नं.७०२०७८२२४९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो.स्टे.२८८/२०२४,भादविक ४०८,३८१ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २२ वर्षे, रा.औंध,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | १२ मार्च २०२२ पासून ते दिनांक ०८/०२/२०२४ रोजी ११/०० वा.चे दरम्यान शॉप नं.१८, शिवनेरी बिलडींग,कामधून इस्टेट,माळवाडी रोड,हडपसर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वसुंधरा ज्वेलर्स नावाचे दुकानातील फिर्यादी यांनी नेमलेले व्यवस्थापक नमुद इसम याने त्याच्या ताब्यात सोपविलेले ०५ किलो सोने व ५० किलो चांदी तसेच सदर दुकानात ॲडव्हान्स म्हणुन जमा झालेले रू. ०२ लाख रोख रक्कम विश्वासघात करून स्वतःच्या फायद्यासाठी अफरातफर करुन सोने व चांदी चोरी करून घेवून गेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.महेळ कवळे मो.नं.९६८९९५६९९९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो.स्टे.७६/२०२४,भादविक ३७९,४२७ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २७ वर्षे, रा.बुलढाणा |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/०२/२०२४ रोजी सायंकाळी १९/२० वा. ते सायंकाळी २०/०० वा.चे सुमारास तुळसी हॉटेल समोर,खराडी बायपास चौक, नगर पुणे रोडवर खराडी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांची चारचाकी गाडी वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी लॉक व पार्क करुन मित्रासह चहा पिण्यासाठी गेले असता कोणीतरी अज्ञात इसमाने कारचे ड्रायव्हर साईटची पाठीमागील काच कशाने तरी फोडुन कार मधील ठेवलेली काळया रंगाची बॅग व त्यातील रोख रक्कम २,५०,०००/- ही कोणीतरी अज्ञात इसमाने लबाडीचे इराद्याने फिर्यादी यांचे संमतीशिवाय, स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता चोरून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.कदीर देशमुख मो.नं.८४२१०३१५७३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो.स्टे.२९०/२०२४,भादविक ३५३,३३२,१८९,३२३,५०४,५०६ भा.द.वि.सं.सह कलम ३, ५ सार्वजनिक संपत्ती हानी प्रतिबंधक अधिनियम १९८४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३८ वर्ष रा.देहुगाव,पुणे |
| **आरोपीत** | ख्रिस्तोफर जॉन नाईक, वय २६ वर्षे, रा.गोपाळपट्टी, मांजरी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक१४/०२/२०२४ रोजी दु.१५/१५ वा.चे.सुमारास पुणे महानगर पालिकेचे हडपसर क्षेत्रीय कार्यालय,हडपसर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक या पदावर काम करीत असुन पुणे महानगर पालिकेचे हडपसर क्षेत्रीय कार्यालय येथे सरकारी काम करीत असताना व कर्तव्यावर असताना यातील नमुद इसम याने पुणे सोलापुर रोड, सावली फाउंडेशनच्या कॉर्नरला, हडपसर, पुणे येथील अनधिकृतपणे व रस्त्यावर अतिक्रमन केलेल्या गोरीला ग्लासच्या दुकानावर कारवाई केल्याच्या रागातुन व पुढे कारवाई करू नये म्हणुन फिर्यादी यांना हाताने मारहाण करून फिर्यादीचा शर्ट फाडून शिविगाळ करून ऑफिसमधल्या फाईली फेकुन देवून काच फोडून सरकारी कार्यालयाचे नुकसान करून पाहून घेण्याची धमकी देवून फिर्यादीचे सरकारी कामामध्ये अडथळा आणला |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी.डोंगरे मो.नं.९२८४१३६८८६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**